**प्रेस नोट** **दिनांक ०७/०८/२०१९**

**हडपसर पोलीस स्टेशन, पुणे**

## कपडयाचे दुकान फोडण्याच्या तयारीत असणारी टोळी हत्यारांसह जेरबंद

दिनांक ०६/०८/२०१९ रोजी तपास पथकाचे अधिकारी सपोनि चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक पाचपुते, सहा.पोलीस फौजदार पठाण व तपास पथकातील कर्मचारी असे हडपसर पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेप्रतिबंधक पेट्रोलींग करीत असताना फिरत फिरत गंगानगर, फुरसुंगी पुणे येथे आले असता अंदाजे रात्रौ २३/३० वाजण्याचे सुमारास गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पाच ते सात इसम मंतरवाडी फाटा जवळ कपडयाचे गोडावुनच्या पाठीमागे मोकळया जागेत फुरसुंगी पुणे येथे थांबलेले असुन ते कपडयाचे गोडावुन व दुकानावर वर दरोडा घालुन तेथील कपडे व रोख रक्कम लुटणार आहेत अशी बातमी मिळाल्याने हडपसर तपास पथकाने मंतरवाडी येथील असलेल्या कपडयांचे, साडयांचे गोडावुन चे आजुबाजुस थांबुन सापळा रचुन सदर इसमांना पकडत असतांना सदर ठिकाणावरुन पळुन जावु लागले तेव्हा त्यांचा पाठलाग करुन पळुन जाणारे इसमांपैकी पाच इसमांना जागीच ताब्यात घेण्यात पोलीसांना यश आले. पकडण्यात आलेल्या इसमांची नावे १) प्रमोद सुभाष शिंदे, वय २७ वर्षे, रा. गल्ली नं. ७, ससाणेनगर, विकी भोसले यांचे घरात भाडयाने, हडपसर, पुणे, २) शेखर सुरेश गायकवाड, वय ३५ वर्षे, रा. दुधाच्या डेअरी जवळ, देवाची ऊरुळी चौकीचे पाठीमागे, देवाची ऊरुळी, ता. हवेली, जि. पुणे ३) शोएब मजिद शेख, वय १९ वर्षे, बँक ऑफ महाराष्ट्र चे पाठीमागे, भेकराईनगर, पुणे सासवड रोड, फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे ४) देविदास घनशाम पवने, वय २१ वर्षे, रा. प्रगती शाळेजवळ, काळेपडळ, हडपसर, पुणे ५) निखील रविंद्र वाघमारे, वय १९ वर्षे, रा. शेवाळवाडी भाजी मंडई समोरील नर्सरीच्या पाठीमागे, राजु पाटील यांचे घरात भाडयाने शेवाळवाडी, मांजरी, ता.हवेली, जि. पुणे असे असुन त्यांना दाखल गुन्हयात दिनांक ०७/०८/२०१९ रोजी पहाटे अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपी यांचेकडुन दोन कोयते, एक कटावणी, एक कटर, एक्सा ब्लेड, मिरची पुड, दोरी असा एकुण १,०१०/-रु.किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो॥, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो॥, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो॥, हडपसर विभाग पुणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक शिवाजी शिंदे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उप निरीक्षक पाचपुते, सहा.पोलीस फौजदार पठाण, पो.हवा. ३८६८ औचरे, पो.हवा. ५५६२ नवले, पो.ना. ५८५३ दळवी, पो.ना. ६८७० भोजराव, पो.ना. ६४८९ शिवले, पो.शि. ८६९२ शेख, पो.शि. ७५१२ चिवळे, पो.शि. ७६८४ नाळे, पो.शि. ४७९ शेख, पो.शि. ८३७६ कांबळे, पो.शि. ८६६५ पवार यांनी केली आहे.